# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

परिपत्रक

दूरध्वनी क्र : ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५

फॅक्स क्र.: ०२२-४२२१००१९

ई-मेल : mlwbpro53@gmail.com

मका/ग्रंथालय/१७-१८/१६५

हु.बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,

एलफिन्स्टन, मुंबई - ४०० ०१३

दिनांक – २८.०३.२०१८

विषय :- परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती योजना

संदर्भ :- मका/ग्रंथालय/१६-१७/20 दि.२३ जुन २०१६

उपरोक्त संदर्भानुसार, पदव्युत्तर पदवीच्या शिक्षणासाठी तसेच पीएच.डी.साठी परदेशात गेलेल्या कामगार पाल्यांना रु.५० हजार एकदाच शिष्यवृत्ती देण्याची योजना आहे. सदर परिपत्रकात नमुद दोन वर्षाच्या शैक्षणिक खंडाची अट शिथीत करण्यात येत आहे. त्यामुळे कामगार पाल्यांच्या शिक्षणात खंड पडला असला तरी विद्यार्थ्यास सदर योजनेचा लाभ विहित अटींच्या अधिन राहून देण्यास मान्यता व मंजुरी देण्यात येत आहे.

चालू आर्थिक वर्ष सन २०१७-१८ पासून पुढील आदेश निघेपर्यंत सदर परिपत्रक लागू राहील.

कल्याण आयुक्त

प्रत :-

१. सर्व अधिकारी, म.का., मुंबई/का.क्री.भवन, मुंबई
२. सहाय्यक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
३. सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये, मुंबई
४. कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
५. सर्व केंद्र प्रमुख

**सूचना** – गट कार्यालयांनी आपल्या अंतर्गत येणाऱ्या केंद्रांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

परिपत्रक

मका/ग्रंथालय/१६-१७/२०

दूरध्वनी क्र : ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५

फॅक्स क्र.: ०२२-४२२१००१९

ई-मेल : pro.mlwb-mh@gov.in

हु.बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन (प), मुंबई - ४०० ०१३

दिनांक – २३ जून २०१६

विषय :- परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती योजना.

पदव्युत्तर पदवीच्या शिक्षणासाठी तसेच पीएच.डी.साठी परदेशात गेलेल्या कामगार पाल्यांना सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती दिली जाते. पात्र विद्यार्थीस रु.५० हजार शिष्यवृत्ती एकदाच मंजूर केली जाईल. **सदर शिष्यवृत्तीसाठी दोन वर्षांचा शैक्षणिक खंड ग्राह्य धरण्यात येत येईल.**

विभागीय कार्यालयांनी आपल्या स्तरावर अर्थसंकल्पिय तरतुदीच्या अधिन राहून लाभार्थी संख्या निश्चित करावी. लाभार्थीची गुणवत्ता यादी तयार करताना पुढील कालमर्यादेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशिल | अंतिम मुदत |
|---|---|---|
| १. | केंद्रांत अर्ज स्वीकारणे. | ऑक्टोबर अखेरपर्यंत |
| २. | केंद्रांनी गट कार्यालयाकडे अर्ज पाठवणे. | नोव्हेंबरचा दुसरा आठवडा |
| ३. | गट कार्यालयाने विभागीय कार्यालयाकडे अर्ज पाठवणे. | नोव्हेंबर अखेरपर्यंत |
| ४. | विभागीय कार्यालयांनी मंजुरीपत्र निर्गमित करणे. | डिसेंबर अखेरपर्यंत |

नियम व अटी :-

१. शिष्यवृत्ती अर्ज विनामूल्य आहे. मात्र, अर्जदार विद्यार्थीने त्याच्या घराजवळील केंद्राचे सभासद होणे बंधनकारक आहे. सभासदत्व स्वीकारलेल्या केंद्रामधूनच शिष्यवृत्ती अर्ज सादर करावा.

२. अर्जदार मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कक्षेत येणारा कामगार कुटुंबीय असला पाहिजे.

३. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर परदेशात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश मिळेपर्यंत २ वर्षाचा शैक्षणिक खंड (गॅप) पडला तरी अर्जदार सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र राहील.

४. परदेशात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या / पीएच.डी. करणाऱ्या कामगार पाल्यांना या योजनेचा लाभ एकदाच दिला जाईल.

५. विद्यार्थ्यांस मागील वर्षी वार्षिक परीक्षेत किमान ६०% गुण असावेत. प्राप्त अर्जांत विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मेरीट) व मंडळाने निश्चित केलेल्या आर्थिक तरतुदीच्या अधिन राहून शिष्यवृत्ती मंजूर केली जाईल. सर्वांना सरसकट शिष्यवृत्ती मिळणार नाही.

६. अर्जदार परदेशात कोणत्या शाखेचे उच्च शिक्षण घेणार आहे. त्याबाबत संबंधित विद्यापीठ/महाविद्यालय यांच्या दाखल्याची (बोनाफाईड सर्टीफिकेट) झेरॉक्स जोडावी.

७. जूनमध्ये कामगार कल्याण निधी कपात झाल्याची नोंद असलेली पेमेंट स्लीप व आस्थापनेचा दाखला असे दोन्ही कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. जूनमध्ये साखर कारखाने बंद असल्याने कामगारांचा जूनमध्ये पगार होत नाही. अशावेळी जूनऐवजी डिसेंबरची वेतनपावती (पे स्लीप) ग्राह्य मानावी व ती अर्जासोबत जोडावी. डिसेंबरच्या वेतन पावतीत कामगार कल्याण निधी कपात झाल्याची नोंद असावी.

९. कंपनी बंद पडली असल्यास आस्थापनेचा कंपनी बंद पडल्याचा दाखला जोडावा. सदर दाखला तीन वर्षापर्यंत वैध राहील.

१०. शिष्यवृत्ती रक्कम लाभार्थीच्या बँक खात्यात ऑनलाईन जमा होणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचे स्वतःचे (किंवा पालकासह संयुक्त) खाते बँकेत असणे बंधनकारक आहे. **सदर बँक खाते विद्यार्थ्याने त्याच्या आधार क्रमांकाशी लिंक करुन घ्यावे.**

११. विद्यार्थ्याने शक्यतो बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये खाते उघडावे. तसे शक्य नसल्यास आय.एफ.एस.सी क्रमांक व मायकर क्रमांक असलेल्या राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका व शेड्युल्ड को-ऑप बँकामध्ये खाते उघडावे. मात्र, आय.एफ.एस.सी क्रमांक व मायकर क्रमांक नसलेल्या बँकेत अर्जदाराचे खाते असल्यास अथवा अर्जदाराचे बँक खाते बंद स्थितीत असल्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही व याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१२. पडताळणी करण्यासाठी लाभार्थी विद्यार्थीचे नाव, बँक खाते क्रमांक, बँकेचा मायकर क्रमांक व आय.एफ.एस.सी.क्रमांक यांची नोंद असलेला बँकेचा कॅन्सल चेक (रद्द चेक) किंवा पासबुकची साक्षांकित प्रत (झेरॉक्स) अर्जासोबत जोडावी.

१३. मुक्त विद्यापीठाचे बहिःस्थ शिक्षण / दूरस्थ शिक्षण घेणारे विद्यार्थी, तसेच अप्रँटिसशीप, इंटर्नशीप किंवा शिक्षण घेताना मानधन, मेहनताना, मोबदला घेणाऱ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.

१४. अपंग विद्यार्थींना शासनाच्या धोरणानुसार एकूण शिष्यवृत्ती रकमेच्या तीन टक्के प्रमाणात सरसकट शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल. त्यासाठी टक्केवारी व पालकाच्या उत्पन्न मर्यादेचे कोणतेही बंधन असणार नाही.

१५. विद्यार्थ्याने अर्ज जमा करताना सर्व कागदपत्रे स्वयं-साक्षांकित / साक्षांकित करुन अर्जासोबत जोडल्याची व बँक तपशिल बरोबर भरल्याची खात्री करावी. अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याकडून पोचपावती अवश्य घ्यावी.

**१६. शिष्यवृत्तीस पात्र न ठरलेल्या अर्जदारांची स्वतंत्र यादी प्रसिद्ध करण्यात यावी. त्यात प्रत्येक अर्जाचे शिष्यवृत्ती न मिळाल्याबाबतचे कारण स्पष्टपणे नमूद करावे.**

१७. विभागीय कार्यालयांनी मंजुरीपत्रकाची प्रत माहितीस्तव मध्यवर्ती कार्यालयास माहितीस्तव सादर करावी.

पुढील आदेश निघेपर्यंत सदर परिपत्रक लागू राहील.

सोबत : अर्जाचा नमूना व
स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र.

Jadhav
कल्याण आयुक्त

प्रत :-

१. सर्व अधिकारी, म.का., मुंबई/का.क्री.भवन, मुंबई
२. सहाय्यक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
३. सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये, मुंबई
४. कामगार विकास अधिकारी, पुणे, नागपूर
५. कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
६. सर्व केंद्र प्रमुख

सूचना – गट कार्यालयांनी आपल्या अंतर्गत येणाऱ्या केंद्रांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती योजना अर्ज

विद्यार्थ्यांचा फोटो

**कार्यालयीन नोंदीसाठी**

| गट कार्यालय | उत्पन्न गट | सध्या शिकत असलेली इयत्ता | मागील शैक्षणिक वर्षाचे टक्के | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | |
|---|---|
| १) अर्जदार विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव (मराठीत) आडनाव प्रथम : | ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... |
| Student's Name (In English) Surname :<br>First Name :<br>Middle Name : | |
| २) कामगार कल्याण केंद्राचा पत्ता (केंद्राचा शिक्का) : | |
| ३) विद्यार्थ्याचा सभासद नोंदणी क्रमांक : | क्रमांक    दि. |
| ४) विद्यार्थ्याचा संपूर्ण पत्ता : | ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...<br>... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...<br>... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... |
| ५) विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक : | |
| ६) मागील शैक्षणिक वर्ष - सन २०... ... ... ...ची माहिती<br>(सेमिस्टर पद्धत असल्यास दोन्ही सेमिस्टरची एकत्रित टक्केवारी नमूद करावी) | इयत्ता : ... ... ... ... ... ... ... ... ...<br>सेमिस्टर पहिले (........./.........)   सेमिस्टर दुसरे (......../........)   एकूण गुण (......../.........)   टक्के ( %) |
| ७) परदेशातील उच्च शिक्षणाचा तपशिल :<br>(अभ्यासक्रमाचे नाव, इयत्ता, महाविद्यालय व विद्यापिठाचे नाव, पत्ता) | ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...<br>... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...<br>... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... |
| ८) विद्यार्थ्याचा बँक खात्याचा तपशिल : बँकेचे नाव व शाखा : | ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... |
| बचत खाते क्रमांक :<br>आय.एफ.एस.सी.कोड :<br>मायकर क्रमांक : | |
| ९) विद्यार्थ्याचा आधार कार्ड क्रमांक | |
| १०) पालकाचे (वडील/आई) संपूर्ण नाव : | ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... |
| ११) पालकाच्या कंपनी/आस्थापनेचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्र. : | ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...<br>... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...<br>... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... |

---

**पोचपावती**

अर्जदार श्री/श्रीमती ........................ ........................ .............................. यांनी संपुर्ण माहिती भरलेला व सर्व आवश्यक प्रमाणपत्रे/दाखले जोडलेला सर्वसाधारण शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज माझ्याकडे जमा केला आहे. अर्जात कोणतीही त्रुटी नसल्याची व अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे जोडल्याची खात्री मी केली आहे.

अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव :... ... ... ... ... ... ... ... ... ... ... .. पदनाम ... ... ... ... ... ...

कर्मचाऱ्याची सही : ... ... ... ... ... ... दिनांक : . ... ... ... ... ...

केंद्राचे नाव (केंद्राचा शिक्का) :

## आस्थापनेचा दाखला

**(वेतन पावतीत कामगार कल्याण निधी कपात झाल्याची नोंद नसल्यास सदर दाखला जोडावा)**

श्री/श्रीमती——————————————————————————हुद्दा——————————————हे/ह्या आमच्या आस्थापनेत/कंपनीत कामावर आहेत. त्यांचे माहे जून / डिसेंबर २०——— चे वेतन रु.———————— असून त्यातून महाराष्ट्र कामगार कल्याण निधीची रक्कम रु.६ / रु.१२ फक्त कपात करण्यात आली आहे.

आस्थापना नोंदणी क्रमांक (EST. Code No. ——————————————)

आस्थापनेचा शिक्का
(सील व पत्ता असलेला)

आस्थापना अधिकाऱ्याची स्वाक्षरी/दिनांक :
अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :

---

## आवश्यक प्रमाणपत्रे/दाखले (झेरॉक्स)

| अ.क्र. | *अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याने साक्षांकीत प्रमाणपत्रे/दाखले तपासून कंसात ( ✓ ) बरोबरची खुण करावी.* | |
|---|---|---|
| १. | मागील वर्षाची गुणपत्रिका (सेमीस्टर पद्धत असल्यास दोन्ही सेमिस्टरची गुणपत्रिका जोडावी) | (   ) |
| २. | चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड सर्टीफिकेट | (   ) |
| ३. | पासपोर्ट, व्हीसा, विमान तिकीट | (   ) |
| ४. | रेशनकार्ड /ई.एस.आय.सी./पालकाचे आधार कार्ड | (   ) |
| ५. | विद्यार्थ्याचे आधार कार्ड | (   ) |
| ६. | कामगार कल्याण निधी कपात दर्शवणारी पालकाची जून महिन्याची वेतन पावती. **किंवा** वेतन पावती नसल्यास आस्थापनेचा दाखला. **(मूळ प्रत)** | (   ) |
| | किंवा कंपनी बंद पडली असल्यास आस्थापनेचा कंपनी बंद पडल्याचा दाखला जोडावा. सदर दाखला तीन वर्षापर्यंत वैध राहील. | (   ) |
| ७. | बँकेचा कॅन्सल चेक/पासबुक झेरॉक्स (विद्यार्थीचे नाव, अकाऊंट नंबर, मायकर क्रमांक व आय.एफ.एस.सी.कोड यांची नोंद असणे आवश्यक) | (   ) |
| ८. | स्वयं-साक्षांकन केले असल्यास स्वयं-साक्षांकन घोषणापत्र. **(मूळ प्रत)** | (   ) |

अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याचे पूर्ण नाव : ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... स्वाक्षरी : .. ... ... ... ... ...

पद : .. ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... दिनांक : ... ... ... ... ... ...

---

## विद्यार्थ्याचे हमीपत्र

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सर्व नियम व अटी मला मान्य आहेत. सदोष व अपूर्ण माहितीमुळे तसेच मंडळाच्या नियम व अटीत न बसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार मंडळाला आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

विद्यार्थ्याचे पूर्ण नाव : ... .... .... .... .... ........ .... .... .... .... .... .... .... ....

स्वाक्षरी : .... .... .... .... ... .... ....          दिनांक : ... .... .... .... .... ........

---

**सोबत**

**१) मार्कशिट  २) बोनाफाईड सर्टिफिकेट  ३) पासपोर्ट, व्हिसा, विमान तिकीट ४) रेशनकार्ड / इएसआयसी /पालकाचे आधारकार्ड  ५) विद्यार्थ्याचे आधारकार्ड  ६) माहे जून वेतन पावती / आस्थापनेचा दाखला /कंपनी बंद पडल्याचा दाखला / मृत्युचा दाखला ७) कॅन्सल चेक, / बँक पासबूक  ८) स्वयं-साक्षांकन घोषणापत्र**